सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला गती येणार

आ. प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन

।**मुंबई** : राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना देण्यासाठी लोकप्रतिनिधीसह अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली आहे. भाजप विधान परिषद गटनेते व मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली ११ जणांची ही समिती स्वयंपुनर्विकास प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने कायदे, नियम, शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन आपला अहवाल तीन महिन्यांच्या आत शासनाला सादर करणार आहे.

स्वयंपुनर्विकास योजनेची व्याप्ती राज्यभर वाढवणे, स्वयंपुनर्विकास योजनेत आर्थिक सहाय्य कसे होईल यविषयी सूचना करणे, म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावरील स्वयंपुनर्विकास कसा करणे याविषयीदेखील समिती अहवालात सविस्तर माहिती देणार आहे. दरेकर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत सिद्धिविनायक न्यास मंदिराचे अध्यक्ष सदा सरवणकर, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी, म्हाडाचे मुख्य अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई पालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त, एमएमआरडीए आयुक्तांनी प्राधिकृत केलेले अतिरिक्त आयुक्त, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी, सिडको व्यवस्थापक, वित्त विभागाचे सह-उपसंचालक, लेखाधिकारी हे सदस्य, तर सहकार विभागातील जिल्हा उपनिबंधक, मुंबई शहर हे या समितीचे सदस्य सचिव असतील. आवश्यक परवानग्या आणि तंत्रसहाय्य जलदगतीने मिळाल्यास स्वयंपुनर्विकास जलदगतीने होणे शक्य आहे. हे लक्षात घेऊन सरकार विविध पावले उचलत आहेत. समिती स्थापन करणे हा त्याचाच एक भाग आहे. दरम्यान, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडचणी सोडवण्यासाठी मुंबई बँकेने स्वयंपुनर्विकास कर्ज योजनेचे एक नवे मॉडेल समोर आणले आहे. आतापर्यंत मुंबई बँकेने ७ स्वयंपुनर्विकास प्रकल्प पूर्ण केले असून १५ प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. यापूर्वी स्वयंपुनर्विकासासाठी शासनाने मुंबई बँकेला नोडल एजन्सी म्हणूनही नियुक्त केले आहे.

भूमिअभिलेख विभागाचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील निलंबित

।**मुंबई** : पुणे हवेली येथील भूमिअभिलेख उपअधीक्षक अमरसिंह रामचंद्र पाटील याच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अंतर्गत येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे त्याचे निलंबन करण्यात आले आहे. या कारवाईमुळे महसूल व भूमिअभिलेख विभागात खळबळ उडाली असून, शासनाने प्रशासनातील भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर भूमिका घेतल्याचा हा स्पष्ट इशारा मानला जात आहे.

अमरसिंह पाटील याच्याविरुद्ध कलम ७ (भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम), तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०८ (२), १९८ व २०१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय, त्यांच्याविरोधात प्राप्त तक्रारींच्या पार्श्वभूमीवर त्याची कामकाजाची सखोल चौकशी करण्यासाठी भूमिअभिलेख विभागाने विशेष समिती गठीत केली आहे. या प्रकरणाच्या गांभीर्याचा विचार करता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ अंतर्गत, पाटील याला तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. पुढील आदेश होईपर्यंत शासन सेवेतून निलंबित असणार आहेत. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय उपअधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालय, लोहारा, जि. धाराशिव येथे निश्चित करण्यात आले असून, त्याने जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख, धाराशिव यांची परवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असा स्पष्ट आदेश देण्यात आला आहे.

मराठी भाषिकांचे कैवारी परदेशात फोटोग्राफी करण्यात मग्न - निरुपम

।**मुंबई** : पहलगाम हल्ल्यानंतर देशभरात शोकाकुल वातावरण असताना मराठी भाषिकांचे कैवारी म्हणवणारे राजकारणी कुटुंबासह परदेशात फोटोग्राफी करण्यात मग्न आहेत, असा हल्लाबोल शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षाने महाराष्ट्रातील पर्यटकांबाबत कोणतीही संवेदना व्यक्त केली नाही. त्याचबरोबर केंद्र सरकारने बोलवलेल्या सर्वपक्षीय बैठकीला त्यांनी पाठ फिरवली, अशी टीकाही त्यांनी केली आहे. निरुपम पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील मराठी पर्यटकांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धावून गेले. मात्र, मराठींचे कैवारी म्हणणारे युरोपात कौटुंबिक सहलीसाठी गेले आहेत. त्यांची आवड वाइल्डलाईफ फोटोग्राफी, टुरिझम असून ते परदेशी खाद्यपदार्थ खाण्यात मग्न आहेत. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रातील पर्यटकांबद्दल संवेदना व्यक्त करण्यास वेळ मिळाला नाही, असा खोचक टोलाही त्यांनी लगावला.

मानव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र. : एमयुएम/एमएमआरडीए/एचएसजी/(टीसी)-९०/२००८

परिशिष्ट क्रमांक १६

उपविधी क्रमांक ३५ अन्वये

नोटीस

या नोटिसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **मानव को. ऑप. हौ. सोसा. लि., इमारत क्र. ११, रुनवाल, म्हाडा वसाहत, आर. एन. ए. पार्क समोर, आर. सी. मार्ग, वाशीनाका, चेंबूर, मुंबई-४०० ०७४** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदांच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदारांची काही हरकत असल्यास अशा वारसदारांनी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणाही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **१५** दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मूळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेला अर्जदारच त्या मयत सभासदाच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत, असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नावे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कारवाईकरीता संबंधित प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अ. क्र.	रूम नं.	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
१	००५	कै. गुलझार मोहम्मद खान	श्री. असलम अजगर अली हुसैन सय्यद	भाऊ

मानव सहकारी गृहनिर्माण संस्था

(शिक्का) सही/- सही/- सही/-
अध्यक्ष सचिव खजिनदार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
पुणे स्टेशन रा.प.बसस्थानक परिसर, पुणे-४११००१,
फोन नं. ०२०-२६१२१६२० । E-mail - deelectcpune@gmail.com

विद्युत विभाग - जाहीर निविदा सुचना क्र.०४/२०२५-२०२६

रा. प. सोलापूर विभागातील बुधवारपेठ येथील विभागीय कार्यशाळेच्या स्क्रॅपयार्ड जवळील आवारात विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या बसेसकरीता विद्युत चार्जिंग स्टेशनचे काम करणे. कामाचे ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक २४/०४/२०२५** पासुन उपलब्ध होईल. त्यानुसार ई-निविदेच्या अटी व शर्तीचे पालन करणाऱ्या योग्य निविदाकाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

कार्यकारी अभियंता (विद्युत)
रा.प.मुंबई (कॅम्प-पुणे)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

जा.क्र. SRA/CO/OW/2025/10698
दिनांक : २२/०४/२०२५.

विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस

सी. एस. क्र. १/१६८ (पै) आणि सी. एस. क्र. १/१७३ (पै) ऑफ परेल-शिवडी विभाग, बंदबावडी, टी. जे. रोड, न्यु चायना मिल समोर, शिवडी, मुंबई-१५ या मिळकतीवर **नियो. दुर्गामाता एस. आर. ए.** सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी **विकासक मे. सहाना बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. व वास्तुविशारद श्री. संजय नेवे अॅण्ड असोशिएटस्** यांचेमार्फत प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. सचिव, झो. पु. प्रा. यांनी सदर योजनेस आशयपत्र निर्गमित करण्यापूर्वी सहकार विभागाकडून नवीन ना हरकत पत्र व नवीन जीबीआर घेण्याचे निर्देश दिले असल्याचे कार्यकारी अभियंता-एफ/एस यांनी या कार्यालयाच्या निदर्शनास आणून तसा अहवाल/ना हरकत पत्र सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यासाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांनी **दि. २२/०३/२०२५** रोजीच्या पत्रान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

त्यास अनुसरून प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार सदर संस्थेची विशेष सर्वसाधारण **सभा शनिवार, दि. ०३/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. स्थळ : प्लॉट नं. २२, कोळी समाज हॉल, जगदंबा रेस्टॉरन्ट जवळ, शिवडी फाटक समोर, शिवडी कोळीवाडा, एमपीटी रोड, शिवडी (पूर्व), मुंबई- ४०० ०१५** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थेच्या प्रारूप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट झोपडीधारकांनीच आवश्यक त्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.

सभेपुढील विषय

०१. नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
०२. नियोजित संस्थेचे नवीन विकासक व वास्तुविशारद यांची निवड करणे.

सही/-
(विरधवल जाधव)
दिनाक : २२/०३/२०२५. प्राधिकृत अधिकारी तथा
ठिकाण : बृहन्मुंबई. सहकारी अधिकारी, श्रेणी-२ झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

सूचना :
१. सभेस संस्थेच्या प्रारूप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट झोपडीधारक पती/पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.
२. प्रारूप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट व्यक्तींनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड/पॅन कार्ड अथवा निवडणूक ओळखपत्र, इत्यादी) उपस्थित रहावे.
३. संस्थेच्या सभासदांना सभागृहात प्रवेश देतेवेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थित नोंदवहीत स्वाक्षरी करून व बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.
४. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

जा.क्र. SRA/CO/OW/2025/10696
दिनांक : २२/०४/२०२५.

-: विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस :-

सी.एस.क्र. १/१६८ (पै), १७४ (पै) परेल- शिवडी विभाग, गिरीजा शंकर तिवारी चाळ, टी. जे. रोड, शिवडी, मुंबई - १५. या मिळकतीवर **नियो. श्री लंबोदर एस. आर. ए.** सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी **विकासक मे. सहाना बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. व वास्तूविशारद श्री. संजय नेवे अॅण्ड असोशिएटस** यांचेमार्फत प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. सचिव, झो.पु. प्रा. यांनी सदर योजनेस आशयपत्र निर्गमित करण्यापूर्वी सहकार विभागाकडून नवीन ना हरकत पत्र व नवीन जीबीआर घेण्याचे निर्देश दिले असल्याचे कार्यकारी अभियंता-एफ/एस यांनी या कार्यालयाच्या निदर्शनास आणून तसा अहवाल / ना हरकत पत्र सादर करणेबाबत कळिवलेले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यासाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांनी **दि. २२/०३/२०२५** रोजीच्या पत्रान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

त्यास अनुसरुन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार सदर संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. ०३/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. स्थळ : प्लॉट नं. २२, कोळी समाज हॉल, जगदंबा रेस्टॉरन्ट जवळ, शिवडी फाटक समोर, शिवडी कोळीवाडा, एमपीटी रोड, शिवडी (पूर्व), मुंबई- ४०० ०१५.** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट - २ मध्ये समाविष्ट झोपडीधारकांनीच आवश्यक त्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.

सभेपुढील विषय

०१. नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
०२. नियोजित संस्थेचे नवीन विकासक व वास्तूविशारद यांची निवड करणे.

सही/-
(विरधवल जाधव)
दिनाक : २२/०३/२०२५. प्राधिकृत अधिकारी तथा
ठिकाण : बृहन्मुंबई. सहकारी अधिकारी, श्रेणी-२ झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

सूचना :
१. सभेस संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट झोपडीधारक पती/पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.
२. प्रारुप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट व्यक्तींनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड/पॅन कार्ड अथवा निवडणूक ओळखपत्र, इत्यादी) उपस्थित रहावे.
३. संस्थेच्या सभासदांना सभागृहात प्रवेश देतेवेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थित नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमेट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.
४. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

जा.क्र. SRA/CO/OW/2025/10693
दिनांक : २२/०४/२०२५.

-: विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस :-

सी.एस.क्र. १/१६८ (पै), १ए/१६८ (पै), १७४ (पै) परेल- शिवडी विभाग, संजय नगर, स्वान मिल समोर, टी. जे. रोड, शिवडी, मुंबई - १५. या मिळकतीवर **नियो. संजय नगर एस. आर. ए.** सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी **विकासक मे. सहाना बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. व वास्तुविशारद श्री. संजय नेवे अॅण्ड असोशिएटस** यांचेमार्फत प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. सचिव, झो.पु. प्रा. यांनी सदर योजनेस आशयपत्र निर्गमित करण्यापूर्वी सहकार विभागाकडून नवीन ना हरकत पत्र व नवीन जीबीआर घेण्याचे निर्देश दिले असल्याचे कार्यकारी अभियंता-एफ/एस यांनी या कार्यालयाच्या निदर्शनास आणून तसा अहवाल / ना हरकत पत्र सादर करणेबाबत कळविलेले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यासाठी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांनी **दि. २२/०३/२०२५** रोजीच्या पत्रान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे.

त्यास अनुसरुन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४४ (ड) नुसार सदर संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. ०३/०५/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. स्थळ : प्लॉट नं. २२, कोळी समाज हॉल, जगदंबा रेस्टॉरन्ट जवळ, शिवडी फाटक समोर, शिवडी कोळीवाडा, एमपीटी रोड, शिवडी (पूर्व), मुंबई- ४०० ०१५** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट - २ मध्ये समाविष्ट झोपडीधारकांनीच आवश्यक त्या ओळखपत्रासह उपस्थित राहावे.

सभेपुढील विषय

०१. नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड करणे.
०२. नियोजित संस्थेचे नवीन विकासक व वास्तूविशारद यांची निवड करणे.

सही/-
(विरधवल जाधव)
दिनाक : २२/०३/२०२५. प्राधिकृत अधिकारी तथा
ठिकाण : बृहन्मुंबई. सहकारी अधिकारी, श्रेणी-२ झो.पु.प्रा., बृहन्मुंबई.

सूचना :
१. सभेस संस्थेच्या प्रारुप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट झोपडीधारक पती/पत्नी या दोघांपैकी एकाच व्यक्तीस उपस्थित राहता येईल. इतर नातेवाईकांना अथवा प्रतिनिधींना उपस्थित राहता येणार नाही.
२. प्रारुप परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट व्यक्तींनी स्वतःची ओळख होईल अशा ओळखपत्रासह (आधार कार्ड/पॅन कार्ड अथवा निवडणूक ओळखपत्र, इत्यादी) उपस्थित रहावे.
३. संस्थेच्या सभासदांना सभागृहात प्रवेश देतेवेळी त्यांनी त्यांची ओळख पटवून सभेच्या उपस्थित नोंदवहीत स्वाक्षरी करुन व बायोमेट्रीक पध्दतीने उपस्थिती नोंदविल्यानंतरच सभागृहात प्रवेश दिला जाईल.
४. सभेच्या कामकाजाचे प्राधिकरणामार्फत व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येईल.

निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
१	**राजेश एस. मोरे (कर्जदार), रूपा राजेश मोरे (सहकर्जदार), सुरेखा एस. मोरे (सहकर्जदार)**	एलएएन नं. : एलएमयूएम०टीयू००००४८७०६ व एलएमयूएम०एचएल००००४८४८२ अंतर्गत दि. २५.०४.२०२५ रोजीनुसार रक्कम **रु. २३,५७,३८२.५६** (रु. तेवीस लाख सत्तावन्न हजार तीनशे ब्याऐंशी व छप्पन पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च.	**रु. २०,७०,०००/-** (रु. वीस लाख सत्तर हजार मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. २,०७,०००/-** (रु. दोन लाख सात हजार मात्र)	**२०.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० वा. (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**
परीक्षणाचा दिनांक व वेळ : दि. ०६.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.००			प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. २८.०१.२०२५	

प्रतिभूत संपत्तीचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड - फ्लॅट क्र. क्यू ००३, मोजमापित साधारण ३७५ चौरस फूट बिल्टअप क्षेत्र तळमजला, क्यू विंग, इमारतीचे नाव ''चंद्रेश रिजन्सी (एल ते एस)'' को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., लोढा हेव्हन, निळजे-कल्याण-शीळ रोड, डोंबिवली (पूर्व)-४२१ २०४, ता. कल्याण, जि. ठाणे, तळ+४ मजल्यांचा समावेश असलेली इमारत, लिफ्टशिवाय, सर्व्हे क्र. १३८ व अन्य, हिस्सा क्र. १, २ धारक जमिनीवरील, मौजे निळजे, ता. कल्याण, जि. ठाणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील, डोंबिवली शाखा, नोंदणीकरण जिल्हा ठाणे व उपनोंदणीकरण जिल्हा, डोंबिवली शाखा येथील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई-लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : १९.०५.२०२५.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिशः संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : ९००४३५९८३५/९७६८७४६६२४ सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २६.०४.२०२५ निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

निडो होम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही कर्जदार, सहकर्जदार व हमीदार यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ
१	**विकास भगवान जाधव (कर्जदार), मोनिका पांडुरंग घनघाव (सहकर्जदार)**	एलएएन नं. : एलकेवायएनएसबीआय००००९४५४८ अंतर्गत दि. २५.०४.२०२५ रोजीनुसार **रु. १६,८७,६७५.२७** (रु. सोळा लाख सत्त्याऐंशी हजार सहाशे पंचाहत्तर व सत्तावीस पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च	**रु. १२,५७,९२८/-** (रु. बारा लाख सत्तावन्न हजार नऊशे अठ्ठावीस मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. १,२५,७९२/-** (रु. एक लाख पंचवीस हजार सातशे ब्याण्णव मात्र)	**२०.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)**
परीक्षणाचा दिनांक व वेळ : दि. ०७.०५.२०२५ रोजी स. ११.०० ते दु. ३.००			प्रत्यक्ष ताबा दिनांक : दि. १९.१२.२०२४	

प्रतिभूत संपत्तीचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. १०१, पहिला मजला, ए विंग, इमारतीचे नाव न्यू शारदा सीएचएसएल लि. (पूर्वी शारदा अपार्टमेंट या नावाने ज्ञात), कुडूस वाडा-४२१ ३१२, बिल्टअप क्षेत्र ४२५ चौ. फूट, क्षेत्र मोजमापित ३९.४९ चौ. मी., गट क्र. २१०/१, गाव कुडूस, ता. वाडा, जि. पालघर येथील, ग्रामपंचायत कुडूस हद्दीतील, ता. वाडा, नोंदणीकरण जिल्हा व उपनोंदणीकरण पालघर येथील.

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **''ऑनलाइन ई-लिलावात''** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड,
बँक : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : १९.०५.२०२५.
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७**, हेल्पलाइन ई-मेल आयडी : Support@auctiontiger.net येथे व्यक्तिशः संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : (श्रीकांत पाठारे) ९७६८७४६६२४/(श्रीमती सुरेखा भांगे) ९००४३५९८३५ सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २६.०४.२०२५ निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

पंचशिल को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र. एमयुएम/एमएमआरडीए/एचएसजी/(टी.सी.)/१२१/२००८-०९

परिशिष्ट क्रमांक १६

उपविधी क्रमांक ३५ अन्वये

नोटिस

या नोटिसव्दारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील संस्थेतील **पंचशिल को. ऑप. हौ. सोसा. लि., इमारत क्र. १३/अे, न्यु आरएनए पार्क, वाशीनाका, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४** असून या संस्थेत खालील दिलेल्या विवरण व माहितीप्रमाणे खालील मयत सभासदाच्या नावे सदनिका असून त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या खालील वारसांनी त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरिता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे. संस्थेच्या मयत सभासदाने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदा १९६० नियम १९६१ व उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेकडे वारस नोंद केलेली नाही. अर्ज केलेल्या खालील वारसदार व्यतिरिक्त इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा अर्जातील वारसदाराबाबत इतर कोणीही मूळ मयत सभासदाचे वारसदार असल्यास किंवा वारसदाराबाबत इतर कायदेशीर सहवारसदारांची काही हरकत असल्यास अशा वारसदारांनी तसेच सदर सदनिकेवर कोणत्याही प्रकारचा बँका, वित्त संस्था किंवा कोणीही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर बोजा असल्यास अशा व्यक्ती किंवा संस्थांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील संस्थेचे सचिव यांच्याशी पूर्व सूचना व वेळ घेऊन प्रत्यक्ष कायदेशीर मूळ कागदपत्र व पुराव्यासह कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६ ते ९ या वेळेत संपर्क साधावा. विहीत मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे आक्षेप न आल्यास संस्थेकडे वारसदार म्हणून अर्ज केलेले अर्जदारच त्या मयत सभासदांच्या सदनिकेचे कायदेशीर वारसदार आहेत असे समजून संस्था अशा अर्जदार व्यक्तीच्या नांवे त्या मयत सभासदाचे भाग व संस्थेतील सदनिका हस्तांतरीत करेल व कायदेशीर कारवाईकरीता संबंधित प्रशासकीय कार्यालयाकडे शिफारस करेल. त्यानंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे अर्ज कार्यकारी मंडळ विचारात घेणार नाहीत किंवा कोणत्याही प्रकारची कायदेशीर नुकसान भरपाई करण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळाची असणार नाही.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसांची सूची

अ. क्र.	रुम नंबर	मयत सभासदाचे नांव	अर्जदार वारसाचे नांव	नाते
१	१३/ए १०१	कै. श्रीमती सावित्री ललन स्वर्णकार	श्री. पिंटु लल्लन स्वर्णकार	मुलगा

पंचशिल को. ऑप. हौसिंग सोसायटी लि.

(शिक्का) सही/- सही/-
अध्यक्ष सचिव खजिनदार

सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

CFM ARC thoughtful regeneration
CIN: U67100GJ2015PTC083994

नोंदणीकृत कार्यालय : ब्लॉक क्र. ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लबजवळ, सर्व्हे क्र. ८३५/१+३, एस. जी. हायवे, मकरबा, अहमदाबाद-३८० ०५१. **कॉर्पोरेट कार्यालय** : पहिला मजला, वेकफील्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८

सरफेसी कायदा, २००२ च्या अनु. १३ (८) अंतर्गत सूचना

प्रति,
१. नरेश बाबूलाल भानुशाली - कर्जदार/गहाणवटदार : ए/५०५, प्रभूरामचंद्र अपार्टमेंट, घर क्र. ५८६ व ५८७, बानकोडे, सेक्शन १२ ई, कोपरखैराणे, नवी मुंबई-४०० ७०९
२. श्रीमती निशा नरेश भानुशाली, सहकर्जदार/गहाणवटदार : ए/५०५, प्रभूरामचंद्र अपार्टमेंट, घर क्र. ५८६ व ५८७, बानकोडे, सेक्शन १२ ई, कोपरखैराणे, नवी मुंबई-४०० ७०९
३. श्री. गीतेश बाबूलाल भानुशाली, हमीदार : ए/५०५, प्रभूरामचंद्र अपार्टमेंट, घर क्र. ५८६ व ५८७, बानकोडे, सेक्शन १२ ई, कोपरखैराणे, नवी मुंबई-४०० ७०९
४. श्री. कैलाश शंकरलाल भानुशाली, हमीदार, बी/८०४, निशाद बिल्डिंग, कल्पनगिरी, वैशालीनगर बस स्टॉपच्या समोर, मुलुंड (प.), मुंबई-४०० ०८१

महोदय/महोदया,
संदर्भ : सरफेसी कायदा, २००२ च्या अनु. १३ (८) अंतर्गत कर्जाचे विमोचन

१. अधोहस्ताक्षरित सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. चे प्राधिकृत अधिकारी हे सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अंतर्गत निहित अधिकारांचा वापर करून तुम्हाला खालील सूचना देत आहेत.
२. अधोहस्ताक्षरित हे नमूद करू इच्छित आहेत की, वरील नामित नोटिशीज् यांनी अभिहस्तांकनकार बँक अर्थात जीपी पारसिक सहकारी बँक लि. यांच्याद्वारे **१. श्री. नरेश बाबूलाल भानुशाली, २. श्रीमती निशा नरेश भानुशाली** यापुढे ''कर्जदार'' म्हणून उल्लेखित तसेच **श्री. गीतेश बाबूलाल भानुशाली व श्री. कैलाश शंकरलाल भानुशाली** - यापुढे ''हमीदार'' म्हणून उल्लेखित यांना मंजूर पत सुविधेसंदर्भात दि. ३०.११.२०१७ रोजीनुसार एकत्रित थकीत रक्कम रु. ७५,८८,१८८/- (रु. पंचाहत्तर लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे अठ्ठ्याऐंशी मात्र) अधिक दि. ०१.१२.२०१७ पासून पुढील व्याज रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली आहे. वरील नमूद व्यक्तींनी कायद्याचे अनुच्छेद १३ (२) सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अंतर्गत मागणी सूचना दि. २०.१२.२०१७ मध्ये नमूद केल्यानुसार निर्धारित ६० दिवसांच्या कालावधीच्या आत रकमेचे प्रदान केलेले नसल्याने प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा दि. १५.०२.२०२० रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
३. अधोहस्ताक्षरित याद्वारे तुम्हाला सदर सूचनेद्वारे सूचित करीत आहेत की, सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत तुम्ही खालील निर्देशित केलेल्या रकमेचे प्रदान न केल्यास अधोहस्ताक्षरित हे जनतेकडून निविदा मागवून व जाहीर ई-लिलाव आयोजित करून खालील निर्देशित स्थावर प्रतिभूत संपत्तीची **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'', ''जी काही आहे तेथे आहे'' व ''विनाअडथळा तत्त्वावर''** विक्री करतील.
४. कर्जदार/गहाणवटदार व हमीदारांना याद्वारे सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (८) अंतर्गत सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपलब्ध वेळेत संपूर्ण थकीत रकमेचे प्रदान करून प्रतिभूत संपत्तीसंदर्भातील गहाण सोडवून घ्यावे. अधोहस्ताक्षरित हे याद्वारे सर्व नोटिशीज्ना संयुक्तरीत्या व विशेष स्वरूपात निर्देश देत आहेत की, त्यांनी वरील विहित कालमर्यादेत अर्थात सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संबंधित कर्ज खात्याच्या अधीन असलेले, **दि. २८.०२.२०२५ रोजीनुसार थकीत रक्कम रु. १,८०,६०,४३७.७६ (रु. एक कोटी ऐंशी लाख साठ हजार चारशे सदतीस व शहात्तर पैसे मात्र) अधिक दि. ०१.०३.२०२५ पासून कंत्राटी दराने पुढील व्याज** तसेच प्रदान व/वा वसुलीच्या तारखेपर्यंतचे प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदी रकमेचे प्रदान करावे व संपूर्ण कर्ज दायित्व सोडवून घ्यावे.

प्रतिभूत मालमत्तेचे विवरण

१. दुकान क्र. १, तळमजला, क्षेत्र मोजमापित साधारण ३५६.३९ चौ. फूट बिल्टअप क्षेत्र (३३.११ चौ. मी.), इमारतीचे नाव ''कान्हा' जी रेसिडेन्सी'', प्लॉट क्र. ए-५४, सेक्टर १६, उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई येथील.
२. दुकान क्र. ३, तळमजला, क्षेत्र मोजमापित साधारण ३९८.३७ चौ. फूट बिल्टअप क्षेत्र (३७.०१ चौ. मी.), इमारतीचे नाव ''कान्हा' जी रेसिडेन्सी'', प्लॉट क्र. ए-५४, सेक्टर १६, उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई येथील.

ठिकाण : मुंबई सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २४.०४.२०२५ सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. करिता

सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

CFM ARC thoughtful regeneration
CIN: U67100GJ2015PTC083994

नोंदणीकृत कार्यालय : ब्लॉक क्र. ए/१००३, वेस्ट गेट, वायएमसीए क्लबजवळ, सर्व्हे क्र. ८३५/१+३, एस. जी. हायवे, मकरबा, अहमदाबाद-३८० ०५१. **कॉर्पोरेट कार्यालय** : पहिला मजला, वेकफील्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८

सरफेसी कायदा, २००२ च्या अनु. १३ (८) अंतर्गत सूचना

१. मे. झेड. एस. के. टेक्सटाइल्स - कर्जदार - प्रोप्रा. शेख मोह. झुल्फीकार मोह. मुख्तार, सर्व्हे क्र. ४१/१ व ४२/३, मु. कारिवली गाव, भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२
२. मुदस्सीर अहमद नूर मोह. शेख - हमीदार, खोली क्र. १, ३८७, केहसाव मंझील, रोशन बाग, नारपोली, भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२
३. खान असीफअली नुरुल्लैन - हमीदार, ५०१, ४६, दुसरा मजला, नवजीवन बिल्डिंग, शास्त्रीनगर, मक्का मस्जीदजवळ, तालुका भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२
४. शेख मोह. झुल्फीकार मोह. मुख्तार - गहाणवटदार, फ्लॅट क्र. २०३/ए, रझा कॉम्प्लेक्स, दरगाह रोड, भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२

महोदय/महोदया,
संदर्भ : सरफेसी कायदा, २००२ च्या अनु. १३ (८) अंतर्गत कर्जाचे विमोचन

१. अधोहस्ताक्षरित सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. चे प्राधिकृत अधिकारी हे सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अंतर्गत निहित अधिकारांचा वापर करून तुम्हाला खालील सूचना देत आहेत.
२. अधोहस्ताक्षरित हे नमूद करू इच्छित आहेत की, वरील नामित नोटिशीज् यांनी अभिहस्तांकनकार बँक अर्थात जीपी पारसिक सहकारी बँक लि. यांच्याद्वारे **मे. झेड. एस. के. टेक्सटाइल्स** त्यांचे **प्रोप्रा. शेख मोह. झुल्फीकार मोह. मुख्तार - वर नमूद केल्यानुसार ''कर्जदार'' व मुदस्सीर अहमद नूर मोह. शेख व खान असीफअली नुरुल्लैन - वर नमूद केल्यानुसार ''हमीदार'' तसेच शेख मोह. झुल्फीकार मोह. मुख्तार - वर नमूद केल्यानुसार गहाणवटदार** यांना मंजूर पत सुविधेसंदर्भात दि. ३१.०८.२०१८ रोजीनुसार एकत्रित थकीत रक्कम रु. ७८,९२,४४५.१९ (रु. अठ्ठ्याहत्तर लाख ब्याण्णव हजार चारशे पंचेचाळीस व एकोणीस पैसे मात्र) अधिक दि. ०१.०९.२०१८ पासून पुढील व्याज रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली आहे. गहाणवटदार म्हणून वर नमूद व्यक्तींनी कायद्याचे अनुच्छेद १३ (२) सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अंतर्गत मागणी सूचना दि. २६.०९.२०१८ मध्ये नमूद केल्यानुसार निर्धारित ६० दिवसांच्या कालावधीच्या आत रकमेचे प्रदान केलेले नसल्याने प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा **दि. १४.१२.२०१८** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.
३. अधोहस्ताक्षरित याद्वारे तुम्हाला सदर सूचनेद्वारे सूचित करीत आहेत की, सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या कालावधीच्या आत तुम्ही खालील निर्देशित केलेल्या रकमेचे प्रदान न केल्यास अधोहस्ताक्षरित हे जनतेकडून निविदा मागवून व जाहीर ई-लिलाव आयोजित करून खालील निर्देशित स्थावर प्रतिभूत संपत्तीची **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'', ''जी काही आहे तेथे आहे'' व ''विनाअडथळा तत्त्वावर''** विक्री करतील.
४. कर्जदार/गहाणवटदार व हमीदारांना याद्वारे सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (८) अंतर्गत सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपलब्ध वेळेत संपूर्ण थकीत रकमेचे प्रदान करून प्रतिभूत संपत्तीसंदर्भातील गहाण सोडवून घ्यावे. अधोहस्ताक्षरित हे याद्वारे सर्व नोटिशीज्ना संयुक्तरीत्या व विशेष स्वरूपात निर्देश देत आहेत की, त्यांनी वरील विहित कालमर्यादेत अर्थात सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संबंधित कर्ज खात्याच्या अधीन असलेले, **दि. ३१.०३.२०२५ रोजीनुसार थकीत रक्कम रु. १,७०,२५,३३१.८० (रु. एक कोटी सत्तर लाख पंचवीस हजार तीनशे एकतीस व ऐंशी पैसे मात्र) अधिक दि. ०१.०४.२०२५ पासून कंत्राटी दराने पुढील व्याज** तसेच प्रदान व/वा वसुलीच्या तारखेपर्यंतचे प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदी रकमेचे प्रदान करावे व संपूर्ण कर्ज दायित्व सोडवून घ्यावे.

प्रतिभूत मालमत्तेचे विवरण

जमीन विवरण सर्व्हे क्र. ४२, हिस्सा क्र. १ व सर्व्हे क्र. ४२, हिस्सा क्र. ३, क्षेत्र मोजमापित साधारण ३१७.७२ चौ. मी. व त्यावर निर्मित पॉवरलूम शेड, मोजमापित ३४२० चौ. फूट, मौजे कारिवली, तालुका भिवंडी, जि. ठाणे येथील. मोह. झुल्फीकार मोह. मुख्तार शेख - प्रोप्रा. झेड. एस. के. टेक्सटाइल्स यांच्या मालकीची जागा.

ठिकाण : मुंबई सही/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २४.०४.२०२५ सीएफएम अॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. करिता

बृहन्मुंबई महानगरपालिका

वृक्ष प्राधिकरण

- जाहीर सूचना -

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतुदीनुसार **परिमंडळ-५** मधील **'एल'** विभागातील **०१** प्रस्ताव आणि **परिमंडळ-६** मधील **'एस'** विभागातील **०४** प्रस्ताव व **'टी'** विभागातील **०१** प्रस्ताव असे **एकूण ०६ प्रस्ताव** मा. महानगरपालिका आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण (बीएमसी)/वृक्ष प्राधिकरण (बीएमसी)/महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण यांच्या मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे/पुनर्रोपित करणेबाबत तपशील हा महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी → विभाग आणि खाते → खातेनिहाय माहिती पुस्तिका → उद्याने व वृक्ष प्राधिकरण → कागदपत्रे → १३ → जाहीर सूचना - ७ दिवस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहित नमुन्यात (Prescribed Format) उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावयात. तसेच आपण आपल्या आक्षेप/सूचना विहित नमुन्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in ह्या ई-मेलवरही नोंदवू शकतात.

विहीत मुदतीत सादर न झालेले आक्षेप/सूचनेचा विचार करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. लेखी/ई-मेलद्वारे सूचना/आक्षेप पाठवूनही अति आवश्यक असल्यास आपण या सूचना/आक्षेपांच्या लेखी/ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहू शकता. सदर सूचना/आक्षेपाबाबतची सुनावणी **दि. ०५/०५/२०२५** रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात **दुपारी ४.३० ते ०५.००** वाजेदरम्यान करण्यात येईल.

उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी
उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय, २ रा मजला,
हम्बोल्ट पेंग्विन कक्ष, संत सावता माळी मार्ग, भायखळा (पूर्व),
मुंबई - ४०००२७. दूरध्वनी क्र. २३७४२१६२.
Email id - dysg.ta@mcgm.gov.in

सही /-
पीआरओ/२४४/जाहि./२०२५-२६ **उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी.**

येता कणकण तापाची, तपासणी करून घ्या रक्ताची.

पुणे येथील मे. श्री. ए. एस. आलेवार साो. १४ वे सह दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात
दि. किरकोळ अर्ज नं. ६८९/२०२५
निशाणी : ०७

जाहीर नोटीस

1. SMT. MANVINDER KAUR BHUMRA
2. KUMARI ROSHNIT BHUMRA
Both R/at – B / 606, Upvan Tower CHSL, Upper Govind Nagar, Malad East, Mumbai-400097 **... Applicant**

Vs

Nil ... Non Applicant's

नोटीस देण्यात येते कि, उपरोक्त अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट VIII (2) १८२७ प्रमाणे या कोर्टाकडे **मयत, सरबजीत सिंग भुमरा** यांचे **मृत्यु दिनांक १२/०८/२०१९** यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहु अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्याने नेमलेली **तारीख २३/०६/२०२५** रोजी ठीक सकाळी ११:०० वाजता स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर राहावे.

आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी सही व शिक्क्यानिशी दिला.

(शिक्का) हुकूमान्वये, सही/- अधीक्षक
दिवाणी न्यायालय, पुणे

पाथर्डी नगरपरिषद, पाथर्डी, जि. अहिल्यानगर

बांधकाम विभाग
दि.२५/०४/२०२५

ई- निविदा सुचना २०२५-२६

1. साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामे करणे.
2. नागरी क्षेत्रात विशिष्ट सेवा व सुविधा पुरविणे या योजने अंतर्गत विकास कामे करणे.

पाथर्डी नगरपरिषद, पाथर्डी करीता वरील लेखाशिर्षा मधील नमुद विकास कामे करणे, या कामांसाठी निविदा पाथर्डी नगरपरिषदेमार्फत बी-१, दोन लिफापा पद्धतीने महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम किंवा ईतर तत्सम खात्यात नोंदणीकृत असलेल्या योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून ई निविदा मागविण्यात येत आहे. कामाच्या निविदा केवळ ई - निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. सविस्तर ई निविदा सुचना निविदेचा विस्तृत नमुना कामाच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in/nicgep/app या वेबसाईटवर (संकेत स्थळावर) **दि. २६/०४/२०२५ ते दि.०३/०५/२०२५ पर्यंत** उपलब्ध आहेत.

(शिक्का)
सही/-
(संतोष लांडगे)
मुख्याधिकारी
पाथर्डी नगरपरिषद, पाथर्डी